सार्वजनिक आरोग्य विभागातील व ग्रामविकास
विभागाच्या अखत्यारीतील जिल्हा परिषद/पंचायत
समितीतील फिरतीवर असणाऱ्या आरोग्य सेवेतील
कर्मचाऱ्यांना कायम प्रवास भत्ता वाढ
मंजूर करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक :संघट २००५ प्र.क्र.१५१/सेवा-१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - ११ ऑक्टोंबर, २००६

वाचा - शासन निर्णय क्र.एएसओ १०९०/१४९१/(६८/९०)/सेवा-६ दिनांक १९ जानेवारी १९९५

**शासन निर्णय :-**

संदर्भाधिन क्रमांक १ येथील दिनांक १९ जानेवारी, १९९५ च्या शाससन निर्णयान्वये आरोग्य विभागातंर्गत कार्यरत असलेल्या फिरतीवरील कर्मचाऱ्यांना कायम प्रवास भत्ता मंजुर करण्यात आला आहे. फिरतीवर असणाऱ्या कर्मचाऱ्यायना दिल्या जाणाऱ्या कायम प्रवास भत्यात सन १९९५ पासून अद्याप वाढ करेलेली नाही.

२. दरम्यानच्या काळात एस.टी महामंडळाने आपली भाववाढ अनेक वेळा केली आहे. त्याप्रमाणात कर्मचाऱ्यांना कायम प्रवास भत्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागातील तसेच जिल्हा परिषद स्तरावरील आरोग्य कार्यक्रम व्यवस्थितरित्या राबविणाऱ्या ३८४०९ कर्मचाऱ्यांना सध्याच्या कायम प्रवास भत्यामध्ये २५% वाढ करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

३. वरील प्रवास भत्यामधील २५% वाढ दिनांक १ एप्रिल २००६ पासून लागु करण्यात येत आहे. त्यामुळे दिनांक १ एप्रिल २००६ ते दिनांक ३० सप्टेंबर २००६ पर्यंतची थकबाकीची रक्कम रोखीने देण्यात यावी व दिनांक १ ऑक्टोंबर २००६ पासून ही वाढ नियमितपणे वेतनातून देण्यात यावी.

४. कायम प्रवासभत्ता अनुज्ञेय होण्यासठी खालील अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

१) संबंधित पदधारकांनी त्यांना नेमून दिलेल्या फिरतीचे दिवसाइतकी फिरती प्रत्येक महिन्यात पूर्ण करणे आवश्यक आहे.

२) केलेल्या फिरतीच्या दिवसांचा आढावा दर तीन महिन्यांनी घ्यावा. ज्या महिन्यात विहित केलेल्या दिवसापेक्षा कमी फिरती असेल त्या महिन्याचा भत्ता अनुज्ञेय होणार नाही. तथापि काही आकस्मिक परिस्थितीत कर्मचाऱ्याला नेमून दिलेल्या दिवसाच्या संख्येची पूर्तता करणे त्यास शक्य न झाल्यास विभाग प्रमुख, संबंधित कर्मचारी त्यांच्या आवाक्या बाहेरील कारणामुळे अशी पूर्तता करु शकला नाही. अशी त्याची खात्री झाल्यास ते अशा कर्मचाऱ्यास त्यामहिन्याच्या फिरतीच्या दिवसांच्या संख्येच्या प्रमाणात कायम प्रवास भत्ता मंजूर करु शकतील

३) कायम प्रवास भत्ता धारकांनी पुढील महिन्याचा नियोजित फिरती कार्यक्रम आगोदरच्या महिन्याच्या १० तारखे पर्यंत खाते प्रमुखास सादर करावा, व त्याप्रमाणे फिरती करावी.

४) उपरोक्त दैनंदिनी प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेस सादर करावा व त्या दैनंदिनीस कार्यालय प्रमुखांची मान्यता दिल्या शिवाय पुढील महिन्याचा कायम प्रवास भत्ता अदा करु नये.

५) फिरतीच्या दिवशी शासकिय वाहानाचा उपयोग केल्यास त्या दिवसाचा १/४ कायम प्रवास भत्ता कपात करावा.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.५) मधील कलम २४८ परतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्या संबधातील इतर सर्व अधिकार याचा वापर करुन शासन असा आदेश देत आहे की, उपरोक्त तक्त्यात दर्शविण्यात आलेली जी पदे दि.१२/९/८५ च्या आदेशात नमूद केलेले जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर असलेल्या पदांना व तत्सम जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांना वरील आदेश योग्य

५. शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील लेखाशिर्षांतर्गत एकूण रु. ५,३७,३६,९१२/- (रुपये पाच कोटी सदतीस लाख छत्तीस हजार नऊशे बारा फक्त) इतक्या रक्कमेचा निधी जुलै २००६ च्या पावसाळी अधिवेशनात विधीमंडळाने मान्य केला आहे. त्यामधून सन २००६-२००७ मध्ये मंजूर केलेल्या अर्थसंकल्पित तरतूदीतून भागविण्यात यावा.

मागणी क्र.आर-१

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य,

६० - सार्वजनिक आरोग्य,

००१ - संचालक व प्रशासन,

००१(पाच) - जिल्हा परिषदांना सहायक अनुदाने

(०१)(०६) - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (२२१० ०३१८)

६. वरीलप्रमाणे मंजूर केलेला निधी मासिक कॅश फ्लो नुसार मुक्त करण्यात येत असून मासिक कॅश फ्लो च्या मर्यादेत हा खर्च राहील याची दक्षता संबंधितांनी घ्यावी.

७. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने अनौपचारिक संदर्भ क्र.८४९/२००६/व्यय-१३,दिनांक ४ ऑक्टोबर, २००६ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अ.शि.बेळगुद्री)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति,

महालेखापाल, महाराष्ट्र- १/२, (लेखा परीक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
ग्राम विकास विभाग, मंत्रालय मुंबई.
वित्त विभाग मंत्रालय, मुंबई (सेवा-५)
अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई
सर्वअतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा
सर्व सहसंचालक, आरोग्य सेवा
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व उपसंचालक आरोग्य सेवा
सर्व सहाय्यक संचालक आरोग्य सेवा(हिवताप)
सर्व कोषागार अधिकारी
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी/ जिल्हा हिवताप अधिकारी/हत्तीरोग अधिकारी
कक्ष अधिकारी (अर्थ संकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई
सर्व कार्यासनि आरोग्य विभाग, मुंबई
अध्यक्ष माहाराष्ट्र राज्या जिल्हा परिषद, आरोग्य कर्मचारी संघटना सोलापूर
निवड नस्ती (सेवा-१)

जा.क्र.आरोग्य/लेखा २/आरआर/३/०७
आरोग्य विभाग,जिल्हा परिषद जळगांव
दिनांक ३/१/०७

प्रति - गटविकास अधिकारी ................. ता .................

यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

२) वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र........... ता. ............. जि.जळगांव

वरील शासन निर्णयाप्रमाणे देयके सादर करावे.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,जळगांव